**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, रस्ते, सडक परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रस्तावित वडोदरा मुंबई द्रुतगती मार्गाच्या मुख्य आखणीच्या कि.मी. २६.५८२ (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी. ०+०००) पासून सुरु होणा-या आणि एमएमआरडीएच्या मल्टी मोडल कॉरिडॉर सोबतच्या प्रस्तावित जंक्शन (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी.७९+७८३) ला संपणा-या आठ पदरी स्पर विकास परियोजनेच्या पालघर जिल्ह्यातील वसई व वाडा तालुक्यामधून जाणा-या १८.९०० कि.मी. पट्ट्याच्या प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

**संदर्भः-**

१) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार.

२) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४-०९-२०२० चे निर्देश

३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे क्रं.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२० चे निर्देश

४) महाराष्ट्र सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, मुंबईचे दि. ०३/१२/२०१९ चे निर्देश

-------------

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, रस्ते, सडक परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रस्तावित वडोदरा मुंबई द्रुतगती मार्गाच्या मुख्य आखणीच्या कि.मी. २६.५८२ (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी. ०+०००) पासून सुरु होणा-या आणि एमएमआरडीएच्या मल्टी मोडल कॉरिडॉर सोबतच्या प्रस्तावित जंक्शनला (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी.७९+७८३) संपणा-या आठ पदरी स्पर विकास परियोजनेच्या पालघर जिल्ह्यातील वसई व वाडा तालुक्यामधून जाणा-या १८.९०० कि.मी. पट्ट्याच्या प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी वार – बुधवार, दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी दुपारी ११.३० वाजता मकवाना फार्म हाऊस, हनुमान मंदिराजवळ, गाव – भाताने, तालुका – वसई, जिल्हा – पालघर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसूचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-२५, व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०३०३एफटीएस-००७३ दिनांक ०३-०३-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, पालघर - अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - सदस्य
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी,ठाणे-२ - आयोजक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे

श्री. ईश्वर ठाकरे, उप प्रादेशिक अधिकारी, ठाणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (संदर्भ क्रं. २ वरिलप्रमाणे) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (संदर्भ क्रं. ३ वरिलप्रमाणे) दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Physical Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात फक्त १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास उर्वरित व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधी देण्यात येईल असे त्यांनी सांगितले. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारिरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरची व्यवस्था बैठकीच्या स्थानी प्रवेशव्दाराजवळ करण्यात आलेली होती. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक यांनी डॉ. माणिक गुरसाळ, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. राजेन्द्र राजपूत, प्रादेशिक अधिकारी - ठाणे, म.प्र.नि. मंडळ, ठाणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक

१ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार आणि सागरीतटीय विनियोग अधिनियम, दिनांक ०६-०१-२०११ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री ठाकरे यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, रस्ते, सडक परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रस्तावित वडोदरा मुंबई द्रुतगती मार्गाच्या मुख्य आखणीच्या कि.मी. २६.५८२ (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी. ०+०००) पासून सुरु होणा-या आणि एमएमआरडीएच्या मल्टी मोडल कॉरिडॉर सोबतच्या प्रस्तावित जंक्शनला (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी.७९+७८३) संपणा-या आठ पदरी स्पर विकास परियोजनेच्या पालघर जिल्ह्यातील वसई व वाडा तालुक्यामधून जाणा-या १८.९०० कि.मी. पट्ट्याच्या प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला होता. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग ए – ७ (एफ) मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहीर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेची नोंद घेऊन समितीकडे सादर करणे आहे. संयोजकाने अशी माहिती दिली की, प्रकल्प प्रवर्तकाने जुलै २०१९ मध्ये ईआयएचा अभ्यास करण्यासाठी टीओआर प्राप्त करण्यासाठी एमओईएफसीसीकडे अर्ज केला होता, ईएसीच्या उपसमितीने नोव्हेंबर २०१९ मध्ये प्रस्तावित एसपीयूआर साइटला भेट दिली होती आणि प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी दिनांक १३ जुलै, २०१९ रोजी मागितली व सदरहू विभागाने दिनांक १६ मार्च, २०२० रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती – Terms of Reference) देण्यात आली होती.

सदरहू जनसुनावणी ही आज दिनांक २४-०३-२०२१ रोजी आयोजित करण्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर यांनी मान्यता दिलेली आहे, त्यानुसार पर्यावरण अधिसूचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक मराठी वृत्तपत्र दैनिक सकाळ व राष्ट्रीय इंग्रजी वृत्तपत्र दैनिक फ्री प्रेस मध्ये दिनांक २०/०२/२०२१ रोजी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेण्याबाबत सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर, तहसीलदार, तहसील कार्यालय- वसई, वाडा, जिल्हा – पालघर, ग्रामपंचायत कार्यालय-, कोशिंब, खर्डी, शिरड, काशिद-कोपर, मांडवी, चंदीप, नवसई, भाताने, अडाने, भिनर, अंबोडे, कलमोन, तालुका – वसई, जिल्हा-पालघर आणि ग्रामपंचायत कार्यालय – गोरड, केलटन, निंबवली, तालुका-वाडा, जिल्हा – पालघर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक अधिकारी – ठाणे, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ५ वा मजला, ऑफिस कॉम्प्लेक्स बिल्डिंग, वागळे इस्टेट, मुलुंड चेकनाका समोर, ठाणे – ४०० ६०४, प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण, उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सिध्दीविनायक संकुल, ३ व ४ मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (प.), जि. ठाणे – ४२१ ३०१ आणि मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. आयोजक यांनी असे सांगितले की, स्थानिक म.प्र.नि. मंडळ कार्यालयास काही लेखी आक्षेप प्राप्त झालेले आहेत. आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती नोंदवण्याची संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री. ठाकरे यांनी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने एनएचआयने नियुक्त केलेले पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू द्रुतगती मार्ग वसई तालुक्यातील कोशिंब गाव येथून सुरु होतो व रायगड जिल्ह्यातील मोरबे गावात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या (एमएमआरडीए) मल्टी मोडल कॉरिडॉर सोबतच्या प्रस्तावित जंक्शनवर संपतो. पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील बारा गावे आणि वाडा तालुक्यातील तीन गावे अशी एकूण पंधरा गावे बाधित होणार असून पालघर जिल्ह्यात १८.९०० कि.मी. लांबीचा स्पर आखणीचा द्रुतगती मार्ग विकसित करण्यात येईल.

सादरीकरणानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की, कोविडच्या पार्श्वभूमीवर ही जनसुनावणी आयोजित करण्यात आल्याने त्यांनी मुखपट्टी / मास्क व्यवस्थित घालावी. त्यांनी सादरीकरणानंतर एखादा मुद्दा समजला नाही तर तो विचारण्याचे आवाहन केले. त्यांनी उपस्थितांना प्रकल्पाबाबत काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) <u>श्री. अशोक शांताराम कासार, राहणार – भाताने गाव, तालुका-वसई, जिल्हा-पालघरः-</u>

श्री. अशोक कासार यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक यांनी सादरीकरण चांगले केलेले आहे. मात्र स्थानिकांच्या शाश्वतीसाठी काही गोष्टींचे स्पष्टीकरण देणे जरुरीचे आहे. आमच्या गावाला अंडरपास देण्यात आलेला नाही. त्यामुळे वाटारडयांना आमच्या गावाशेजारील ऊसगावला जावे लागेल ज्याला अंडरपास राहील. तर आमच्या गावाजवळ बांधकाम राहील का मातीचा भराव राहील?

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ज्याप्रमाणे आराखडा तयार केलेला आहे, त्याप्रमाणे प्रकल्प हा राबविण्यात येऊन पुर्ण करण्यात येईल. तसेच सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे हा एक्सप्रेस वे असून आपली मागणी रास्त आहे, कारण दोन्ही बाजूस कुंपण आहे. आपणास रस्ता ओलांडायचा आहे. एक्सप्रेस वे चे जे निकष आहेत, त्याप्रमाणे तरतुदी केलेल्या असून त्या पाळण्यात येतील. तेथे व्हीओपी केल्यानंतर दोन्ही बाजूस बोगदा असतो, तेथे भराव टाकून त्याची उंची वाढविण्यात येते. ज्याठिकाणी फ्लायओव्हर असतो, तेव्हा तो पिलर्सवर येतो. भराव हा आराखड्याप्रमाणे करण्यात येईल. त्यांनी पुढे सांगितले की ब-याच वेळा जे साहित्य उपलब्ध असेल त्याचा भराव करण्यात येतो. सध्या वेस्ट मटेरिअलचाही वापर करण्यात येतो, उदा- पॉवर प्रकल्पातील जी फ्लाय ॲश आहे, ती मिळाली तर तिचा वापर जेथे जेथे भराव बांधावयाचा आहे, तेथे वापरण्यात येईल.

उपस्थितांपैकी काही व्यक्तींनी विचारलेल्या प्रश्नास उत्तर देताना प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे उत्तर दिले की, वसई तालुक्यातील काशीद-कोपर जे गाव आहे, तेथे मोठे इंटरचेंज होणार आहे. तेथे आपण दोन्हीकडे जाऊ शकाल. एक्सप्रेस वे ने अहमदाबादकडे किंवा मुंबई कडे जाता येईल. अहमदाबादकडून आलेला वसई तालुक्यातील कोशिंबकडे जाऊ शकेल. त्यामुळे स्थानिकांना त्या इंटरचेंजपर्यंत जावे लागेल. प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे उत्तर दिले की पावसाळ्यात रस्ता बंद न पडण्यासाठी परिसरातील पाण्याच्या पातळीचा अभ्यास केला जातो. त्यामुळे १.५ ते २ मीटर्स एवढा मातीचा थर टाकून त्यावर सिमेंटचा स्तर असतो, त्यामुळे रस्ता

पाण्याच्या पातळीच्या वर असतो. यावेळी उपस्थितांनी पावसाळ्यात रस्ते पूर्णपणे पाण्यात जातात हे सांगितले. त्यावेळी उत्तर देण्यात आले की येथे सर्वजण समुद्र पातळीबरोबरच राहतात. पण रस्त्यामुळे पाणी अडेल व गाव बुडेल असे होणार नाही. कारण रस्त्याला बोगदे असल्याने पाणी अडणार नाही व रस्त्याच्या कडेला असलेल्या नैसर्गिक स्त्रोतास जोडणार असल्याने रस्त्यावर पाणी साचणार नाही. त्यावेळी उपस्थितांनी प्रश्न उपस्थित केला की वाडा तालुक्यात जरी एक दिवस पाऊस झाला तरी येथे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. येथे पाण्याचा भोवरा तयार होतो.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनवाणी समिती यांनी मत मांडले की त्यांच्या सूचनेची इतिवृतांतात नोंद घेण्यात आलेली असून प्रकल्प प्रवर्तकांनी पावसाळ्यात रस्त्यांमुळे पाणी साचणार नाही याची दक्षता यंत्रणेने घ्यावी अशी सूचना केली. अध्यक्षांनी सांगितले की अतिवृष्टीची व्याखेत ६५ मिलीमीटर पाऊस झाल्यास त्यास अतिवृष्टी संबोधण्यात येते. आता ६५ मिलीमीटर पाऊस होत नाही, पावसाळ्यात एखाद्या दिवशी १००-२०० मिलीमीटर पाऊस झाला तर पूर परिस्थिती निर्माण होते. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनवाणी समिती यांनी मत मांडले की, प्रकल्प पूर्ण झाल्यावरही स्थानिकांना काहीही त्रास होऊ नये. स्थानिक जनतेचा संपर्क तुटायला नको व हानी होऊ नये याबाबत करण्यात येणा-या उपाययोजनांची माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नोंद घेण्यात यावी.

२) **<u>श्री कृष्णा भोईर, राहणार-वाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-</u>**

यांनी सांगितले की या रस्त्याची उंची ही ३-५ मीटर्स आहे अशी मी माहिती मिळविलेली आहे. मी तलासरी ते बदलापूर पायी फिरलेलो आहे व सदर रस्ता २००-५०० मीटर अंतरावर घेतलेला असून डोंगराच्या लगतच आहे. आमच्या शेतक-यांच्या जमिनी पाण्यात बुडतील, नापिक होतील. वस्त्या बुडतील. पाणी व्यवस्थित वाहून गेले पाहिजे. दुसरा प्रश्न येथे उपस्थित होतो की प्रकल्पातील बराच रस्ता जंगलपटट्यातून जाणार आहे. त्यामुळे बरीच वनसंपदा नष्ट होईल. तिसरा प्रश्न_आमच्या भागात साटोरी घाणी, कंगोण, लेंडी कंगोण, निंबोळी येथे गरम पाण्याचे कुंड आहेत. त्यावर बांधकाम झाल्यास त्यामुळे भूकंप झाल्यास तेथे या प्रकल्पामुळे काहीही बदल होऊ नये यासाठी शासनाने पर्यायी व्यवस्था व अभ्यास करणे गरजेचे आहे. जेणेकरुन्न स्थानिक शेतक-यांना त्याचा काही त्रास होऊ नये.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की, श्री. भोईर हे सुरवातीपासूनच या प्रकल्पात असून त्यांनी काही सूचना या ग्रामसभेला केलेल्या होत्या. त्यांनी सांगितले की कुठलाही नैसर्गिक प्रवाह बंद करण्यात येणार नाही. त्यामुळे पाणी साठवून राहणे होणार नाही. नाला असेल तर त्याठिकाणी पूल बांधण्यात येईल. ब-याच

ठिकाणी चौकोनी बोगदे ठराविक अंतरावर बांधण्यात येतील त्यामुळे पाणी थांबणार, अडणार नाही. पुढचा प्रश्न वनसंपदेचा विचारला, उदा. वाडयात बरीच जमिन ही वनविभागाची आहे. तर हा पूर्णपणे वनखात्याचा प्रश्न असून वन विभागाची आम्हांला स्वतंत्र परवानगी घ्यावी लागते. सर्व प्रस्तावाची छाननी केली जाते. कुठल्या प्रजातीची झाडे तोडावी लागत आहे, आघात कमी होण्यासाठी किती व कुठल्या प्रजातीची झाडे लावावित याबाबत वन खाते मार्गदर्शन करेल. वन खाते जे जे मोबदला सांगेल, तो मोबदला प्रकल्प प्रवर्तकांकडून अदा करण्यात येईल. जेणेकरुन वनजमिनीचे आणि पर्यावरणाचे कमीतकमी नुकसान होईल.

सदरहू प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भूकंपाबाबत उत्तर देताना माहिती दिली की, शासनाने भूकंपक्षेत्र (सेसमिक झोन) घोषित केलेले असते. प्रकल्पाचा आराखडा करताना त्या त्या भूकंपक्षेत्रातील भूकंपाच्या तीव्रतेनुसारच बांधकाम करण्यात येते. त्यामुळे बांधकामाचे व स्थानिकांचे नुकसान होणार नाही. वाहतुकीला व रस्त्याला कोणाताही धोका राहणार नाही. त्यांनी पुढे सांगितले की गरम पाण्याच्या कुंडावरुन रस्ता जात नाही. आपण वज्रेश्वरीला पाहतो की गरम पाणी हे भूगर्भातून येत असते. तेथपर्यंत रस्त्याचे बांधकाम जात नाही. आपण खोदकाम करुन रस्ता करत नसून रस्ता भरणार आहोत. त्यामुळे गरम पाण्याच्या कुंडांचे नुकसान होण्याची शक्यता नाही.

३) **<u>श्री शांताराम जाधव, राहणार-भाताने, तालुका-वसई, जिल्हा-पालघरः-</u>**

यांनी सांगितले की, भातान्याची परिस्थिती वेगळी आहे. होणारा रस्ता हा भातान्यामधून जातो. पलिकडे ज्यांच्या जमिनी असतील त्यांनी कुठून जायचे हा प्रश्न आहे. जर एकच अंडरपास/पाऊलवाट ठेवणार असाल, तर दुस-या बाजूस शेती करण्यासाठी ३-४ कि.मी. लांब जायला लागेल. तरी मध्येमध्ये शेतक-यांना दुस-या बाजूस जाण्यासाठी रस्ते ठेवले पाहिजे. गाव उत्तरेकडे, तर स्मशानभूमी दुस-या बाजूला आहे, त्याबाबत काय व्यवस्था करणार?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनवाणी समिती यांनी सूचना केली की रस्ता विकसित करताना स्थानिकांच्या गरजा लक्षात घेऊन अंडरपास/पाऊलवाटा पुरविण्यात याव्यात. स्मशानभूमीबाबत त्यांनी सूचना केली की जर स्मशानभूमी दुस-या बाजूस असल्याने स्थानिकांना अडचण येत असेल, तर प्रकल्प प्रवर्तकांनी गावक-यांच्या सहमतीने दुसरी स्मशानभूमि विकसित करुन गावास द्यावी. येथे प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की हा एक्सप्रेस वे असून दोन्ही बाजूस कुंपण राहणार आहे. गावतील जे मोठे रस्ते क्रॉस होत असतील, त्याला व्हीओपी आणि बोगदा याची तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे अंडरपास पुरविण्यात येणार

आहे. गावात पायवाटा भरपूर असतात. तर एक्सप्रेस वे च्या निकषांनुसार प्रत्येक ५०० मीटर्स अंतरावर अंडरपास/पायवाटा पुरविण्यात येईल. ५०० मीटर्स पेक्षा जास्त कुठेही जावे लागणार नाही हा निकष आहे. तरीसुध्दा स्थानिकांनी त्यांच्या सूचना वा आक्षेप असल्यास ते लेखी स्वरुपात द्यावे. त्याचा निश्चितच विचार करण्यात येईल.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनवाणी समिती यांनी सांगितले की जरी बैठकीचे रेकॉर्डिंग होत असेले तरी आपण आपल्या सूचना लेखी स्वरुपात द्याव्यात. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना केली की स्थानिक रहिवाशांच्या वाहतुकीसाठी अडथळा न येण्यासाठी आणि दुचाकी वाहतुकीत अडथळा न येण्यासाठी जास्तीत जास्त अंडरपास वाढविण्याचा/देण्याचा प्रयत्न करण्याची सूचना केली.

४) **<u>सौ. सुगंधा सचिन जाधव, माजी सभासद, वसई पंचायत समिती, जिल्हा – पालघर:-</u>**

नवसई ते अडाने या परिसरात राहणा-या शेतक-यांची दक्षिणेकडे शेतीचे प्रमाण जास्त आहे, तरी शेतीसाठी पायरस्ते असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे बैठकीत झालेल्या चर्चेनुसार स्मशानभूमीला जर पर्यायी जागा दिली तर नवीन स्मशानभूमी विकसित करण्यात येऊ शकते. स्थानिक शेतकरी पर्यायी जागा देऊ शकतात. त्याचप्रमाणे नवसाईतून शेतीसाठी दक्षिण भागास जाण्यासाठी प्रकल्प प्रवर्तक जे बोगदे करुन देणार आहेत, त्यांची अतिरिक्त माहिती उपस्थितांना देण्यात यावी. कारण शेती लांब असल्याने आताच आम्हांला शेतावर पोहचण्यासाठी अर्धा ते पाऊण तास लागतो. जर हे बोगदे नवसाईफाटा किंवा मध्ये कुठे दिल्यास आम्हांला त्याचा भरपूर त्रास होईल. शेतक-याला शेतावर जाण्यास नाहक त्रास होईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की वरिल मुद्द्यांची नोंद यापूर्वीच घेण्यात आलेली आहे. तसेच असे मत मांडले की हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर येथील संपूर्ण जीवनमान बदलेल.

सौ. जाधव यांनी सांगितले की शेतीबरोबरच आम्ही जोडधंदा म्हणून आंब्याची वाडी विकसित केलेली आहे त्याचे नुकसान या प्रकल्पामुळे झालेले आहे.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प पूर्ण झाल्यावर जमिनीच्या भावात बराच फरक पडेल.

५) **श्री सुजय मोरे, राहणार-पालघर, जिल्हा-पालघरः-**

यांनी तीन तांत्रिक प्रश्न विचारले.

अ) आपल्या येथे बरेच वन्यप्राणी आहेत. ते मौसमाप्रमाणे/हंगामाप्रमाणे स्थलांतर करत असतात. बरेच वन्यप्राणी तानसा ते कळसूबाई असे हंगामी स्थलांतर करत असतात. त्यांच्यावर ह्या प्रकल्पाचा काही परिणाम होईल का?

ब) हाजीमलंग ते माथेरान येथे बरेच लहान-मोठे किल्ले आहेत. पुरातन तत्वांनुसार त्यांच्यावर काही परिणाम होईल का?

क) अलाईनमेंट बघितली तर सी - सेक्शन आहे, हा आपण जॉईंट करतो, बाकी अस्तित्वात रस्ता असतानाही एवढे बांधकाम करण्याची गरज आहे का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की, पुरातत्व विभाग हा संपूर्णपणे स्वतंत्रपणे कार्यरत असतो. त्यास सर्व माहिती सादर करण्यात आलेली होती व नुकत्याच मिळालेल्या माहितीप्रमाणे पुरातत्व विभागाने ना हरकत प्रमाणपत्र सदरहू प्रकल्पास दिलेले आहे. ३०० मीटरच्या आत असलेल्या पुरातत्व बांधकाम/स्मारक याचा अभ्यास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना सर्वेक्षणात करण्यात आलेला होता. व त्यास ना -हरकत प्रमाणपत्र वेगळे असण्याची आवश्यकता नाही.

प्रकल्प प्रवर्तकांनी पुढे उत्तर दिले की उपस्थितांनी एवढा लांब आराखडा का केला, तर त्याचे उत्तर आपणच दिलेले आहे. सरळ रेषेत भिवंडी, अंबरनाथ गाव आहे. जेएनपीटीहून येणारे कंटेनर्स गावातील अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर येऊन वाहतुक कोंडी टाळण्यासाठीच हा प्रकल्प आहे. हा प्रकल्प अवजड वाहनांसाठी बांधलेला आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी हंगामातील वन्यजीव स्थलांतराबाबत उत्तर देताना सांगितले की, याबाबत वन विभागात वेगळा कक्ष आहे. त्यास प्रस्ताव सादर केलेला आहे. मात्र सदरहू प्रकल्प हा वन्यजीव क्षेत्रातून जात नाही. त्या विभागातील समितीने सदर प्रकल्पास भेट देऊन पाहणी केलेली आहे. हंगामातील वन्यजीव स्थलांतराबाबत वन्यजीव मंडळ जे निर्देश देतील, ते तंतोतंत पाळण्यात येतील. वन्यजीव मंडळ ज्या सूचना करतील, त्याचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात अंतर्भाव करण्यात येईल.

६) **श्री कृष्णा भोईर, वाडा, जिल्हा-पालघरः-**

त्यांनी पुर्नवसनाबाबत प्रश्न विचारताना सांगितले की वाडा तालुक्यातील निंबोळी गावातील ४९ घरे या रस्त्यामुळे बाधित होत आहेत. आम्ही २०१८ पासून शासनाशी ब-याच वेळा पत्रव्यवहार करत आहोत.

पण याबाबत दाद मिळत नाही. त्याचप्रमाणे पुर्नवसनासाठी निंबोळीत जागाही उपलब्ध आहे. आता आम्ही जायचे कुठे हा प्रश्न उपस्थित होतो. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी याबाबत विचारणा करुन संबंधित यंत्रणेस सूचना करण्याचे आश्वासन दिले. वसई व प्रकल्प स्थानी पुर्नवसनाबाबत एक पॅकेज आहे असे त्यांनी सांगितले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक काही आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणाताच प्रतिसाद आला नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहून प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक प्रश्न विचारले त्याबाबत त्यांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की उपस्थितांनी केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद बैठकीच्या इतिवृतांत घेण्यात येणार असून सदरहू इतिवृत्त मराठी व इंग्रजीमध्ये अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयातील तज्ञ समितीस सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्राप्त झालेल्या लेखी सूचनाही भारत सरकारला सादर करण्यात येतील. तेथील तज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल

आयोजक यांनी अध्यक्षाच्या परवानगीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहिर केले.

अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

**(ईश्वर ठाकरे )**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, ठाणे-२

**(डॉ. राजेन्द्र राजपुत)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, ठाणे

**(डॉ. माणिक गुरसाळ)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा
जिल्हादंडाधिकारी, पालघर, जिल्हा-पालघर



Scanned by CamScanner